North Asian International Research Journal of Social Science & Humanities

ISSN: 2454-9827 Vol. 6, Issue-3 March-2020

IRJIF I.F.: 3.015

Index Copernicus Value: 57.07 Indian Citation Index Thomson Reuters ID: S-8304-2016

NAIRJC *A Peer Reviewed Refereed Journal*

DOI: 10.5575/nairjssh.2023.10.3.6

# अमरावती विभागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील पर्यावरण विषयक जागरूकतेचा अभ्यास

**श्रीकांत रामरावजी पर्बत**

प्राचार्य

अध्यापन पदवीका प्रशिक्षण महाविद्यालय, यवतमाळ

**सार :**

प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील पर्यावरणविषयक जागरूकता आणि त्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. या संशोधनासाठी स्तरीकृत नमूना निवड पध्दतीचा वापर करून अमरावती विभागातील 200 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली त्यामध्ये 100 मुले व 100 मुलींचा समावेश करण्यात आला. तथ्यांचे संकलन करण्यासाठी पर्यावरण जागरूकता प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. या संशोधनाच्या संदर्भात प्राप्त तथ्यांचे संकलन करण्यासाठी अनुमानपरक सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या पर्यावरण विषयक जागरूकतेमध्ये सार्थक अंतर नाही. म्हणजे त्यांची पर्यावरण विषयक जागरूकता जवळपास सारखी आहे.

## प्रस्तावना :

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाची आवड निर्माण करण्यासाठी पर्यावरणीय शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. अशा स्थितीत जनसामान्यांमध्ये विशेषतः तरुणांमध्ये पर्यावरणविषयक जागरूकता आणि पर्यावरण विषयक संवेदनशीलता जोपासली गेली पाहिजे. यामध्ये समाजाच्या जागृतीसाठी स्थूल पातळीवर कार्य करणे आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण समाज पर्यावरण संरक्षणासाठी सक्रीयपणे कार्य करू शकतो. जर आपणास विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय मूल्ये रुजवायची असतील, तर आपल्याला पर्यावरणाच्या प्रती आपली असलेली जबाबदारी जाणून घ्यावी लागेल तसेच आपले वर्तन हे पर्यावरणपूरक कसे होईल यासाठी प्रयत्न करावे लागतील. पर्यावरणविषयक जागरुकता हा कोणत्याही पर्यावरणीय अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग असणे आवश्यक आहे. यामाध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या पर्यावरणाच्या रक्षणासाठी सक्रिय भूमिका घेण्यास प्रोत्साहित करण्यात येते. तसेच मानवी

समाज व पर्यावरण यांच्यामधील संतुलन राखले जाऊ शकते. याव्दारे मुलांना त्यांच्या पर्यावरणाबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शिक्षण व्यवस्थेच्या अंतर्गत सर्व स्तरांवर अनिवार्य पर्यावरणीय शिक्षण एक प्रभावी धोरण आहे.

जगातील लोकसंख्येचा जमिनीसह नैसर्गिक संसाधनांवर मोठया प्रमाणात दबाव आहे. या व्यतिरिक्त, पर्यावरणाच्या संदर्भातील मानवी क्रियाकलापांमुळे येत्या काही वर्षांत संपूर्ण जीवाला अनपेक्षितपणे मोठा धोका निर्माण होत आहे. दिवसेंदिवस मानवाचा पर्यावरणामध्ये धुडगुस वाढत आहे. पर्यावरणामधील नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत मार्गाने, निसर्गाशी असहकार करून होणारा वापर हे त्यामागचे मुख्य कारण आहे. अशास्थितीत पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी नागरी समाजाची जागरूकता आणि पर्यावरण विकासामध्ये त्यांचा सहभाग ही एक महत्वपूर्ण पूर्वअट आहे. अशास्थितीत आपल्या हरित ग्रहासाठी आपण समाजामध्ये पर्यावरण विषयक जागरूकता निर्माण करणे महत्वाचे आहे.

## संबंधित पूर्व संशोधनांचा आढावा :

पर्यावरण जागरूकता यासंदर्भात पूर्व संशोधनांचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

मायर (1977) यांनी विद्यार्थ्यांच्या पर्यावरणीय वृत्तीचे मापन करण्यासाठी पर्यावरणीय वृत्ती या साधनाची निर्मिती केली. गुप्ता (1986) यांनी पर्यावरणीय शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास केला यामध्ये त्यांनी स्पष्ट केले की, बहुसंख्य शिक्षकांची पर्यावरण शिक्षणासाठी असलेली वृत्ती अनुकूल होती. शाहनवाज (1990) यांनी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांची पर्यावरण जागरूकता आणि पर्यावरणीय वृत्तीचा अभ्यास केला. सिंग गुलजार (1991) यांनी विशिष्ट व्यवसायातील विविध स्तरावरील कामगारांच्या लोकसंख्या शिक्षण, पर्यावरणीय शिक्षण आणि कुटुंब नियोजनाकडे त्याचा पाहण्याचा दृष्टिकोन यांचा तुलनात्मक अभ्यास केला. साहा (1997) यांनी पर्यावरण व सामाजिक वनीकरणाचा अभ्यास केला यामध्ये त्यांनी स्पष्ट केले की, भारतीय संदर्भात पर्यावरण शिक्षणाची नितांत गरज आहे. Read and Pongracz (2000) यांनी सार्वजनिक शिक्षणामध्ये वाढत असलेल्या पर्यावरण जागरुकतेचा अभ्यास केला यामध्ये स्पष्ट करण्यात आले की, युरोप आणि उत्तर अमेरिकेतील रहिवाशी सर्व प्रकारच्या कचरा व्यवस्थापनामध्ये सहभागी होतात तसेच यामध्ये त्यांना सक्रीयपणे सहभागी करून घेण्यासाठी अनेक तंत्रे वापरली जातात. भारती अनिता, (2002) यांनी वाराणसी शहरातील उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या संदर्भात असलेल्या पर्यावरणीय जागृतीचा अभ्यास केला. सिंग (2005), यांनी सर्वांगीण शिक्षण आणि पर्यावरण जागरूकता यांच्यातील वैज्ञानिक घटनेचा अभ्यास केला. परंतु अमरावती विभागामध्ये माध्यमिक स्तरावर अध्ययन करीत

असलेल्या विद्यार्थ्यांमधील पर्यावरण जागृती व त्यावर परिणामक करणाऱ्या घटकांचा अभ्यास पूर्व संशोधनामध्ये झाल्याचे आढळून येत नाही.

### संशोधनाची उदिदष्टे :

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या पर्यावरण विषयक जागरूकतेचा अभ्यास करणे.
2. पर्यावरण जागरूकतेला प्रभावित करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

### परिकल्पना :

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या पर्यावरण विषयक जागरूकतेमध्ये सार्थक अंतर नाही.

### व्याप्ती व मर्यादा :

- या संशोधनामध्ये अमरावती विभागातील माध्यमिक शाळांचा समावेश करण्यात आला आहे.
- या संशोधनासाठी माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील 200 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.
- या संशोधनामध्ये निवड करण्यात आलेल्या शाळा हया राज्य अभ्यास मंडळाव्दारे मान्यताप्राप्त आहेत.

### संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. अमरावती विभागातील अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा या जिल्हयांमधील माध्यमिक स्तरावर इयत्ता 9 वी मध्ये अध्ययन करीत असलेल्या 200 विद्यार्थ्यांची निवड यादृच्छिक नमूना निवड पध्दतीच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या संशोधनाच्या संदर्भात तथ्यांचे संकलन करण्यासाठी स्व-निर्मित पर्यावरण जागरूकता मापिकेचा वापर करण्यात आला आहे. तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी अनुमानपरक सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला.

### तथ्यांचे विश्लेषण :

प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, टी मूल्य हया तंत्राचा वापर करण्यात आला.

**सारणी क्र. 1.1**

**माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची पर्यावरण विषयक जाणिव जागृती दर्शविणारी सारणी**

| समुह | मध्यमान | प्रमाण विचलन | समुह | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधिनता मात्रा | टी मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण विद्यार्थी (100) | 24.20 | 5.08 | शहरी विद्यार्थी (100) | 25.81 | 5.27 | 198 | 1.720 |
| ग्रामीण मुले (50) | 22.12 | 4.97 | ग्रामीण मुली (50) | 22.19 | 4.56 | 98 | 1.961 |
| शहरी मुले (50) | 23.75 | 4.65 | शहरी मुली (50) | 22.43 | 4.61 | 98 | 1.943 |
| ग्रामीण मुले (50) | 22.12 | 4.23 | शहरी मुले (50) | 23.75 | 4.56 | 98 | 1.994 |
| ग्रामीण मुली (50) | 22.19 | 4.56 | शहरी मुली (50) | 22.43 | 4.61 | 98 | 1.236 |

वरील सारणी वरून स्पष्ट होते की, ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या पर्यावरण विषयक जाणिव जागृतीच्या संदर्भात गणना व्दारा प्राप्त टी मूल्य 1.720 आहे, ग्रामीण मुले व ग्रामीण मुलींच्या पर्यावरण विषयक जाणिव जागृतीच्या संदर्भात गणना व्दारा प्राप्त टी मूल्य 1.961 आहे, शहरी मुले व शहरी मुलींच्या पर्यावरण विषयक जाणिव जागृतीच्या संदर्भात गणना व्दारा प्राप्त टी मूल्य 1.943 आहे, ग्रामीण मुले व शहरी मुलांच्या पर्यावरण विषयक जाणिव जागृतीच्या संदर्भात गणना व्दारा प्राप्त टी मूल्य 1.994 आहे तसेच ग्रामीण मुली व शहरी मुलींच्या पर्यावरण विषयक जाणिव जागृतीच्या संदर्भात गणना व्दारा प्राप्त टी मूल्य 1.961 आहे. यामध्ये ग्रामीण विद्यार्थी व शहरी विद्यार्थी, शहरी मुले व शहरी मुली, ग्रामीण मुली व शहरी मुलींच्या पर्यावरण विषयक जाणिव जागृतीमध्ये सार्थक अंतर नाही, तर ग्रामीण मुले व ग्रामीण मुली आणि ग्रामीण मुले व शहरी मुलांच्या पर्यावरण विषयक जाणिव जागृतीमध्ये सार्थक अंतर आहे. यामध्ये ग्रामीण मुलांची पर्यावरण विषयक जाणिव जागृती ही ग्रामीण मुलींच्या तुलनेत अधिक प्रभावी आहे तसेच शहरी मुलांची पर्यावरण विषयक जाणिव जागृती ही ग्रामीण मुलांच्या अधिक प्रभावी असल्याचे दिसून येते.

## उपयोजन :

या संशोधनाच्या निष्कर्षावरून स्पष्ट होते की, शिक्षकांनी पुस्तकामधील पर्यावरण विषयक माहितीचे हस्तांतरण करण्याऐवजी वेगवेगळ्या शैक्षणिक गटातील विद्यार्थ्यांच्या सकारात्मक विकासाकडे लक्ष देण्यासाठी आवश्यक असलेली विद्यार्थ्यांची वृत्ती टिकवून ठेवण्यासाठी सक्रीय प्रयत्नांची गरज आहे. शैक्षणिक धोरण निर्मात्याने माध्यमिक स्तरावरील पाठयपुस्तकांमध्ये मांडण्यात आलेल्या पाठयक्रमामध्ये पर्यावरण जागरूकता विषयक घटकांचा अंतर्भाव करण्यात यावा. पर्यावरण शिक्षणाशी संबंधित विविध उपक्रम शाळांमध्ये आयोजित करण्यात यावेत. ग्रामीण भागात पर्यावरणाशी संबंधित सामाजिक समस्यांबाबत जनजागृती मोहीम आयोजित करण्यात यावी. माध्यमिक स्तरावर अध्यापनाच्या अंतर्भूत दृष्टीकोनासह पर्यावरणीय शिक्षण हा एक स्वतंत्र घटक म्हणून सादर करण्यात यावा.

## संदर्भ ग्रंथ सूची :


[1].अस्टालिन, पी.के. (2011). उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कर्तव्याविषयी जागरुकतेच्या संबंधात पर्यावरणीय जागरूकतेचा अभ्यास. अप्रकाशित शोध प्रबंध, वारानसी : बनारस हिंदू विद्यापीठ

[2].बेस्ट, जे. डब्ल्यू. (2008). शिक्षणातील संशोधन (10वी आवृत्ती). नवी दिल्ली: प्रेंटिस हॉल ऑफ इंडिया

[3].भारती, अनिता (2002). वाराणसी शहरातील उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांमधील पर्यावरण जागरूकता आणि वैज्ञानिक वृत्ती यांच्यातील संबंधांचा अभ्यास.

[4].गुप्ता, ए. (1986). पर्यावरण शिक्षणाकडे शिक्षकांच्या वृत्तीचा अभ्यास. पुणे : नेहरू मेमोरियल कनिष्ठ महाविद्यालय

[5].जॉन्सन, बी. आणि क्रिस्टेनसेन, एल. (2008). शैक्षणिक संशोधन (तिसरी आवृत्ती). नवी दिल्ली: सेज पब्लिकेशन.